सी.एन.आर.क्र. एम.एच.पी.यु.१८-०००८०४-२०१७
नि. फौ. क्र. ९२/२०१७
निशाणी क्र. ३७

**दोषारोप पुर्वीचा पुरावाः**
**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ :**
कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नांव :- बबन सत्याबा डोंबे, वय :- ५४ वर्षे,
धंदा :- शेती, राहणार :-डोंबेवाडी खोर, ता. दौंड, जि. पुणे.

**दोषारोप पुर्वीचा सरतपास फिर्यादीतर्फे सरकारी वकील श्री. बी. डी. रोडे यांच्यामार्फत सुरुः-**

०१. मी आरोपींना ओळखतो. आरोपींची नावे बाळासो जगन्नाथ डोंबे, शांताराम जगन्नाथ डोंबे असे आहेत. मी तलाठी खोर यांच्याकडे वारस नोंदीसाठी अर्ज केला होता. सदरचा अर्ज तलाठी खोर यांनी गहाळ केला. आरोपी क्र. १ याने खोट्या मजकुराचे प्रतिज्ञापत्र करुन आरोपी क्र. २ व स्वतःचे नाव मी वारस वारस नोंदीसाठी केलेल्या अर्जामध्ये सामील केले. फेरफार नं. ३३४ अन्वये तलाठी यांनी आरोपी क्र. १ व २ चे नावे सामील केले. त्यानंतर सर्कल यांच्याकडे फेरफार नं. ३३४ विरुध्द तोंडी हरकत घेतली व त्यामुळे सदरचा फेरफार रद्द झाला. सर्कल याने न्यायालयाकडुन वारस दाखला आणणेकरिता सांगितले. त्यावरुन आरोपींनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज नं. २८/२०१५ खोट्या शपथपत्राच्या आधारे दाखल केला. आरोपींनी खोटा वंशावेळ दाखवुन आम्ही वारस असतांना फक्त आरोपी क्र. १ व २ हेच वारस आहेत असे दाखविले व अशा प्रकारचे खोटे शपथपत्र करुन न्यायालयाची दिशाभुल करुन वारस दाखला आरोपींनी मिळविला. खोट्या वारस दाखल्या आधारे आरोपींनी गट नं. ९७४ व ९७५ चे ७/१२ स्वतःचे नावांची नोंद करुन घेतली. त्यानंतर आम्ही सर्कल यांच्याकडे लेखी फिर्याद केली व त्याचबरोबर पोलीस स्टेशन, यवत यांच्याकडे देखील लेखी फिर्याद केली. पोलिसांनी आम्ही दिलेल्या लेखी तक्रारीची दखल घेतली नाही. त्यानंतर प्रस्तुतचा खाजगी तक्रार या न्यायालयात दाखल केले. माझे असे म्हणणे आहे की, आरोपींनी केलेल्या गुन्ह्याची चौकशी करुन आरोपींना योग्य ते कडक शासन व्हावी ही विनंती.

**दोषारोप पुर्वीचा उलटतपास आरोपी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. डि. ए. शिंदे यांच्यामार्फत सुरुः-**

०२. आरोपी क्र. १ व २ हे माझे चुलत चुलत भाऊ आहेत. प्रस्तुत प्रकरणतील वादातील मिळकत ही मुळची लक्ष्मीबाई रंगोबा डोंबे यांची होती. लक्ष्मीबाई यांनी माझे वडिलांना दत्तक घेतली होती. लक्ष्मीबाई यांची प्रस्तुत केसमधील वादातील मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत आहे. हे खरे आहे की, रंगोबा डोंबे मयत झाल्यानंतर प्रकरणातील वाद मिळकत ही लक्ष्मीबाई यांचे नावे वारसाने आली.

उलटतपास दोषारोप पर्यंत तहकुब करण्यात येते.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**(एस. डी. कुरणे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, पुणे.

ठिकाण : दौंड
दिनांक: २६.११.२०१८.

<u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | अतनुरे एम. सी. |
| कोर्टाचे नांव | :: | श्री. एस. डी. कुरणे<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि.पुणे |
| दिनांक | :: | २६/११/२०१८ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | २६/११/२०१८ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | २६/११/२०१८ |